महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी क्र.** (०२२) २२१६ ३९६४/६५/६९ **फॅक्स :** (०२२) २२१६ ३९७६
**ई-मेल : mercindia@mercindia.org.in •वेबसाईट : www.mercindia.org.in**
मविनिआ

# जाहीर सूचना

**प्रकरण क्र. २०१०/८७** **दिनांक : १० डिसेंबर, २०१०**

## विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) अन्वये सूचना

**मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी लिमिटेड (मुळा प्रवरा सोसायटी), श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर,** वीज वितरणाचे काम अहमदनगर जिल्ह्यातील ५ तालुक्यांमधील सुमारे १८३ गावांमध्ये करीत आहे. मुळा प्रवरा सोसायटीच्या परवान्याची मुदत ३१ जानेवारी, २०११ रोजी संपत असल्यामुळे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (डी)सह कलम १४ नुसार मुळा प्रवरा सोसायटीच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात वीज वितरणाचे काम हाती घेण्यास व त्यासाठी वितरणाचा परवाना मिळविण्यासाठी इच्छुक अर्जदारांकडून (मुळा प्रवरा सोसायटीसह) 'स्वारस्याची अभिव्यक्ती' मागविण्यासाठी दिलेली जाहिरात 'लोकसत्ता' च्या दि. २८ जुलै २०१० च्या आवृत्तीमध्ये आणि 'महाराष्ट्र टाइम्स', 'इकॉनॉमिक्स टाइम्स' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या दि. २९ जुलै २०१० च्या आवृत्तीमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.

२. त्यानंतर, **मुळा प्रवरा सोसायटी**ने वितरण परवानाधारक म्हणून वरील क्षेत्रात विजेचे वितरण करण्यासाठी नवीन वितरण परवाना मिळण्याकरिता आयोगाकडे अर्ज केला. मुळा प्रवरा सोसायटीने आपल्या वितरण परवान्याची मागणी करणाऱ्या अर्जाची नोटीस, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनिमय, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबी व तपशीलासह दि. ५ डिसेंबर, २०१० च्या 'लोकमत टाइम्स', 'संडे सकाळ टाइम्स', 'सार्वमत' आणि 'पुढारी'मध्ये प्रसिद्ध केली. सदर नोटीशीद्वारे जनतेकडून वरील परवाना देण्यासंबंधी हरकती/सूचना मागविण्यात आल्या आहेत. वरील परवान्यासाठीच्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या **www.mercindia.org.in** या संकेतस्थळावर पाहता येईल किंवा कोणत्याही व्यक्तीला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनिमय, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून पाहता येईल.

३. मुळा प्रवरा सोसायटीने प्रसिद्ध केलेल्या वरील सूचनेच्या संदर्भात प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेऊन मुळा प्रवरा सोसायटीला वरीलप्रमाणे परवाना मंजूर करावयाचा किंवा नाही, याबाबत आयोग निर्णय घेईल.

४. ही नोटीस, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) खाली, मुळा प्रवरा सोसायटीला नवीन वितरण परवाना, सर्व सूचना/हरकती विचारात घेण्याच्या अधीन राहून, मंजूर करण्याच्या प्रस्तावासंबंधी देण्यात येत आहे. सध्या मुळा प्रवरा सोसायटीकडून विजेचा पुरवठा करण्यात येत असलेल्या क्षेत्रात (अहमदनगर जिल्ह्यातील ५ तालुक्यांमधील सुमारे १८३ गावे) मुळा प्रवरा सोसायटीला वितरण परवाना देण्याच्या प्रस्तावासंबंधी सूचना/हरकती कोणीही व्यक्ती **शुक्रवार, ७ जानेवारी २०११ पर्यंत** निम्न स्वाक्षरीकाराकडे पाठवू शकेल.

५. ज्या व्यक्तींना सूचना किंवा हरकती पाठवावयाच्या असतील त्यांनी सूचना किंवा हरकती वरील पत्त्यावर इंग्रजी अथवा मराठीत (६ प्रतींमध्ये) पाठवाव्यात व त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता, पिन कोड आणि असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. तसेच जर कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने सूचना/हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. जर सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीशः मांडावयाचे असेल तर तसेदेखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे **यशवंतराव चव्हाण ऑडिटोरियम म्युनिसिपल कौन्सिल, शिवाजी रोड, श्रीरामपूर-४१३ ७०९, येथे शुक्रवार, दि. १४ जानेवारी २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्या व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. या सुनावणीची वेगळी सूचना (नोटीस) देण्यात येणार नाही.

सही/-

**(के. एन. खवारे)**
सचिव, मविनिआ

दिनांक : १० डिसेंबर, २०१०
ठिकाण : मुंबई